# सेवक वार्ता

e-mail : http://www.mahasevak.com
अंक ६, वर्ष - २ एप्रिल २०२१

**सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, पुणे**
**नोंदणीकृत कार्यालय -ब-८, सारसनगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे ४११००२**

## संपादकीय

दरवर्षी आगीचा मौसम सुरू होण्यापूर्वी वनक्षेत्रात जाळ रेषा घेतल्या जातात व त्यामुळे आगी नियंत्रणात राहण्यास मदत होते. मात्र तरीही आगी लागतात व त्या नियंत्रणात आणण्यासाठी अग्नि रक्षक मजूर आग विझवण्याचे काम करतात. नवेगाव नागझिरा अभयारण्य दिनांक ८ एप्रिल २०२१ रोजी नागझिरा व पिटेझरी वनक्षेत्रात भीषण आग लागली. ही आग विझवतांना तीन हंगामी मजुरांचा दुर्दैवी मृत्यू ओढवला तर दोन मजूर जखमी झाले. या घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना माननीय मुख्यमंत्री यांनी प्रत्येकी ५ लाखांची सानुग्रह मदत जाहीर केली. तर जखमींच्या औषधोपचारांचा खर्च देखील शासन करेल असे जाहीर केले. काही स्वयंसेवी संघटना जसे वन्यजीव संवर्धन संस्था देखील मदतीसाठी पुढे आल्या. नागझिरा प्रतिष्ठानने देखील मदत जाहीर केली.

सेवक संघाने देखील आपला खारीचा वाटा उचलण्याचे ठरविले व सर्वानुमते मृतांच्या वारसांना प्रत्येकी १०,०००/- रुपये व जखमींना प्रत्येकी ७,५००/- रुपये मदत तात्काळ करण्यात आली.

ईश्वर मृतात्म्यांना शांती प्रदान करो व त्यांचे कुटुंबियांना या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो ही सेवक च्या सर्व सदस्यांकडून परमेश्वर चरणी प्रार्थना ! जखमी व्यक्ती लवकर बरे होवोत अशीही आम्हा सर्वांची प्रार्थना !

## सेवकची मासिक सभा दिनांक ६ एप्रिल रोजी संपन्न

सेवकची मासिक सभा ६ एप्रिल २०२१ रोजी दृकश्राव्य माध्यमाद्वारे (गुगल मीट) संपन्न झाली. ११ वाजता सुरू झालेल्या या सभेचे अध्यक्षस्थान श्री. शिरीष अस्थाना यांनी भूषविले. या सभेस डॉ. शेषराव पाटील, सर्वश्री विठ्ठल पत्की, वसंत जोशी, संभाजी गवळी, शाम रनाळकर, गिरीश वशिष्ठ, अनिल ठाकरे, मदन कुलकर्णी, बिरदवडे, अशोक कविटकर, सूर्यनारायण बत्तूलवार व उमेश धोपेश्वरकर हे सदस्य हजर होते. बैठकीत खालील विषयांवर चर्चा झाली.

१. वृक्षधन पुस्तकाचे प्रकाशन व विक्री.
२.बांबू रोपवन मूल्यांकनाचे काम इतर राज्यात मिळण्याबाबत
३. अमरावती वृत्ताचे धुळे वृत्ताकडे थकीत रु.४९,५००/-
४. सेवक संघाची सन २०२२ मध्ये होणारी २५ वर्षे
५. गोगटे स्मरणिका
स्मरणिकेचे साठी ४५ लेख प्राप्त झाले असून छपाईचे काम सुरू आहे. या पुस्तकाचे संपादन डॉ. पाटील करीत असल्याचे सांगण्यात आले.
६. सेवक वार्तापत्र मार्च २०२१
या वार्तापत्राची ३ पृष्ठे पूर्ण झाली असून दोन-तीन दिवसात वार्तापत्र पूर्ण होईल असे डॉ. पाटील यांनी सांगितले.
७. नागपूर वृत्ताचे नवीन खाते उघडणे बाबत.
८. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील फुलोरा आलेल्या बांबूचे निष्कासन.
या कामी सेवकच्या टीमने २३ मार्च ते २६ मार्च या कालावधीत पाहणीचे काम केले असून त्याबाबतचा अहवाल तयार करण्याचे काम सुरू आहे.
९. पुणे वृत्त नव्याने कार्यान्वित करणेबाबत.
श्री. बिरदवडे याबाबत एका आठवड्यात एक बैठक घेणार असून नवीन कार्यकारिणी गठित करणार असल्याचे श्री.पत्की साहेबांनी सांगितले.
१०. यवतमाळ वृत्ताची कार्यकारिणी सक्रीय करणेबाबत.
११. ठाणे वृत्त पुन्हा सक्रिय करणेबाबत.
१२.अमरावती वृत्ताची नवीन कार्यकारिणी मंजूर - अमरावती वृत्ताच्या नवीन कार्यकारिणीस अध्यक्षांनी मंजुरी दिली.
१३.अनमोल सेवेबद्दल सत्कार करणेबाबत
अध्यक्षांनी सेवकचे ज्येष्ठ सदस्य श्री. पत्की साहेब व जोशी साहेब यांचा त्यांनी केलेल्या अमूल्य सेवेबद्दल रजत महोत्सवी कार्यक्रमात सत्कार करण्यात येईल असे सुचविले.
१४. डॉ. शेषराव पाटील यांचा सत्कार अध्यक्षांनी डॉ. शेषराव पाटील यांचे जैवविविधता मंडळाचे अध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले. डॉ. पाटील यांनी सेवक संघास आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन देऊन अध्यक्षांचे व सेवक संघाचे आभार मानले.
१५ ऐनवेळचे विषय.

## अमरावती वृत्ताची नवीन कार्यकारीणी मंजुरी.

सेवक संघाच्या अमरावती वृत्ताची बैठक होऊन नवीन कार्यकारीणी गठीत करण्यात आलेली असून ती खालील प्रमाणे आहे.

अ. सहअध्यक्ष, श्री अशोक वामनराव कविटकर से. नि. सहाय्यक वनसंरक्षक

ब. उपाध्यक्ष, श्री राजेंद्र गणपतराव फरकाटे से.नि. विभागीय वन अधिकारी

क. सचिव, श्री राजेंद्र वसंतराव गोपाल से.नि. विभागीय वन अधिकारी

ड. सहसचिव, श्री अनंत नामदेवराव गावंडे से.नि. वनपरिक्षेत्र अधिकारी

इ. कोषाध्यक्ष, श्री सतीश अजबराव गावंडे से.नि. वनपरिक्षेत्र अधिकारी

सदर नवीन गठित कार्यकारीणीस सेवक संघाचे अध्यक्ष श्री अस्थाना साहेब यांनी सर्व सदस्यांचे अनुमतीने या नवीन कार्यकारिणीस मंजुरी प्रदान केली.

**नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील आगीत मृत व जखमींना सेवक संघाची मदत**

दि.१०/०४/२०२१ गोंदिया- नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील नागझिरा व पिटेझरी वनपरिक्षेत्रात गुरुवारी लागलेल्या आगीत तीन हंगामी मजुरांचा होरपळून मृत्यू झाला तर दोन मजूर जखमी झाले आहेत. राकेश युवराज मडावी वय ४० राहणार थाडेझरी, रेखचंद गोपीचंद राणे वय ४५ राहणार धानोरी आणि सचिन अशोक श्रीरंगे वय २७ राहणार कोसमतोंडी अशी मृतकांची नावे असून विजय तीजाब मरस्कोल्हे वय ४० राहणार थाडेझरी व राजू शामराव सयाम वय ३० राहणार बोळुंदा अशी जखमींची नावे असून त्यांना ऑरेंज सिटी हॉस्पिटल नागपूर येथे हलविण्यात आले आहे.




आगीत मृत झालेले राकेश मडावी यांची आई ललीता मडावी यांना धनादेश सूपूर्द करताना श्री. अशोक खुणे

मृतांच्या वारसांना मा. मुख्यमंत्री यांनी प्रत्येकी पाच लक्ष रुपये मदत घोषित केली असून जखमी मजुरांच्या उपचाराचा खर्च शासन करणार आहे. वन्यजीव संवर्धन संस्थेकडून डब्ल्यू सिटी १.२५ लक्ष रुपये नागझिरा प्रतिष्ठान कडून १.५० लक्ष रूपये मदत घोषित केली आहे. सेवानिवृत्त वनकर्मचारी सेवक संघ, पुणे यांचेकडून मृतांचे वारसास प्रत्येकी १०,०००/- रुपये तर जखमींना प्रत्येकी ७,५००/- रुपये अशी ४५,०००/- रुपये मदत केली आहे. नवेगाव नागझिरा अभयारण्याचे क्षेत्र संचालक श्री. एम. रामानुजम यांनी सेवक संघाचे आभार मानले.

**'भगवद गीता टुडे' ह्या पुस्तकाची थोडक्यात प्रस्तावना**

'श्री वसंत जोशी यांची 'भगवद गीता टुडे' ही त्रैभाषिक - संस्कृत श्लोक (मूळ गीतेप्रमाणे), मराठी ओव्या (श्री त्र्यंबक चव्हाण यांनी रचलेल्या) व इंग्लिश व्हरसेस (श्री वसंत जोशी यांनी रचलेल्या) - भगवद गीता आहे. ही गीता श्री वसंत जोशी यानी त्यांच्या 'ज्ञानेश्वरी टुडे' या पूर्वी प्रसिद्ध झालेल्या पुस्तकातील गीतेचा भाग अलग करून वाचकांना सहजरित्या अमर गीतामृताचा रसास्वाद घेता यावा या उद्देशाने ती छापील व डिजिटल अशा दोन्ही माध्यमातून प्रसिद्ध केली आहे.




तसेच डिजिटल प्रत सेवकच्या संकेत स्थळावरही वाचकांसाठी उपलब्ध करून देणेत आली आहे. या पुस्तकाबद्दल श्री. वंसत जोशी यांचे हार्दिक अभिनंदन !

-----------------------------------------------------

प्रकाशक : सेवक, पुणे

संपादन : डॉ. शे. हिं. पाटील, भावसे (सेवानिवृत्त) प्रधान मुख्य वनसंरक्षक